# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**(ISO 9001:2008 प्रमाणित)**

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org Email- roaurangabad@dtemaharashtra.gov.in


**प्रथम प्राध्यान्य/अतितात्काळ/कालमर्यादित**

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१९/ 1110

दिनांक : 4 APR 2019

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय/अनुदानित/विना-अनुदानित पदविका/

पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था,

औरंगाबाद विभाग.

विषय : **सन २०१९ मध्ये घन लागवड संकल्पना राबविणे व त्याचे पूर्वतयारी बाबत...**

संदर्भ : मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे अ.शा.पत्र क्र.२०१९/वृ.स.क/ ३३ कोटी/ कावि-१०९, R. २२.०३.२०१९

दि. २९/१२/२०१९ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या बैठकीत ३३ कोटी वृक्ष लागवडीच्या अनुषंगाने नियोजन आणि पुर्वतयारी करण्याबाबत सूचना देऊन कालबध्द कार्यक्रमाचे नियोजन करुन दिले असून, त्यानुार कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

सदर बैठकीतील निर्णयाप्रमाणे सन २०१९ च्या पावसाळयात करावयाच्या वृक्ष लागवडीसाठी जागेची निवड करुन लँड बँकेची माहिती दिलेल्या विहित मुदतीत सादर करणे, यंत्रणानिहाय समन्वय अधिका-यांची नावे, त्यांचे भ्रमणध्वनी क्रमांक इत्यादी बाबतची अद्यावत माहिती विभागीय आयुक्त कार्यालयास सादर करावयाची आहे. त्याकरीता उपरोक्त संदर्भीय पत्रात दिलेल्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी. संदर्भीय पत्राची प्रत अवलोकनाकरीता सोबत जोडण्यांत येत आहे.

**"३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम सन – २०१९"** घन लागवड स्थळ निश्चिती बाबत माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रात आपल्या संस्थेची माहिती भरुन दि. १०.०४.२०१९ पर्यत विनाविलंब या कार्यालयास सादर करावी. तसेच माहितीची एक प्रत या कार्यालयाच्या ई-मेल roaurangabad@dtemaharashtra.gov.in वर देखील पाठविण्यांत यावी, जेणे करुन मा. विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना मराठवाडा विभागाची एकत्रीत माहिती सादर करणे सोयीचे होईल.

**मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी ज्या संस्थांनी "३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम सन – २०१९" या कार्यक्रमामध्ये सहभाग नोंदविलेला नाही किंवा माहिती वेळेवर सादर केली नाही त्या संस्थेची माहिती सादर करण्याचे या कार्यालयास कळविले आहे. या कार्यक्रमामध्ये सहभाग न नोंदविल्यास किंवा माहिती वेळेवर सादर न केल्यास मा. विभागीय आयुक्त यांच्या समक्ष उपस्थित राहुन खुलासा करावा लागेल, याची नोंद घ्यावी.**

सोबत : वरील प्रमाणे प्रपत्र.

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत : १. मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यलय, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यास्तव.

# प्रपत्र

## ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम सन २०१९
## घन लागवड स्थळ निश्चितीची माहिती

| अ.क्र | सस्थेचे नांव व (संस्था डीटीई कोड ) | जिल्हा | साईट समन्वयकाचे नांव व मोबाईल क्रमांक | नियोजित वृक्ष लागवड संख्या | लागवड स्थाळांचे क्षेत्र (चौ.मी.) | लागवड क्षेत्राचा गट/सर्व्हे नं. | लागवड क्षेत्राचे अक्षांस | लागवड क्षेत्राचे रेखांश | खड्डे खोदकामाची महावार प्रगती | | | एकूण खड्डे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | जानेवारी २०१९ | फेब्रुवारी २०१९ | मार्च २०१९ | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

प्राचार्य